# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४०० ००८

दूरध्वनी - २३०७५५३९/२३०२ ३९०० e-mail : pro@msrtc.gov.in फॅक्स - २३०८६३५२


=====================================================================

## प्रसिध्दी पत्रक

**- गोव्यासाठी एस. टी. ची वातानुकूलित शिवनेरी सेवा -**

**मुंबई, बुधवार, दि. २१ एप्रिल, २०१०**

उन्हाळी हंगामात गोव्याला जाणारी प्रवाशांची वाढती मागणी विचारात घेऊन रा. प. महामंडळातर्फे आज बुधवार,दि. २१ एप्रिल, २०१० पासून मुंबई ते पणजी दरम्यान वातानुकूलित शिवनेरी व्होल्वो सेवा सुरु करण्यांत येत आहे. **आज रात्रौ ८.०० वा. सदर बसचे उद्घाटन राज्याचे परिवहन राज्यमंत्री मा.श्री. गुलाबराव देवकर यांचे शुभहस्ते आणि मा. सुधाकरपंत परिचारक, अध्यक्ष - रा.प.महामंडळ, मा.श्री.दीपक कपूर, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक - रा.प.महामंडळ यांचे प्रमुख उपस्थितीत पार पडले.** सदर बस मुंबई सेंट्रलहून रात्रौ ८.०० वा. सुटुन ५७४ कि.मि.चा प्रवास दादर- कुर्ला नेहरु नगर- पनवेल - महाड - चिपळूण - लांजा - कणकवली -सावंतवाडी मार्गे पार पाडून पणजीत दुस-या दिवशी सकाळी ६.३० वा पोहोचेल. परतीच्या प्रवासासाठी पणजीहून सायंकाळी ८.०० वा. सुटलेली बस मुंबई सेंट्रल येथे दुस-या दिवशी सकाळी ६.३०वा पोहोचेल. मुंबई सेंट्रल ते पणजी प्रवासभाडे रु.८६२/-(प्रौढांसाठी )आकारण्यांत येणार आहे. या वातानुकूलित सेवेमुळे पर्यटनानिमित्त मुंबई ते गोवा दरम्यान प्रवास करणा-या प्रवाशांचा विशेष लाभ होणार आहे.

या बसचे ऑन लाईन आरक्षण महामंडळाच्या www.msrtc.gov.in या संकेतस्थळावर तसेच सर्व आरक्षण केंद्रांवर उपलब्ध करण्यांत आले असून प्रवाशांनी या सेवेचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन रा. प. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दीपक कपूर यांनी केले आहे.

**सहा. जनसंपर्क अधिकारी**

# MAHARASHTRA STATE ROAD TRANSPORT CORPORATION

Central Office, Maharashtra Vahatuk Bhavan, Dr Anandrao Nair Marg, Mumbai Central, Mumbai 400 008

Tel : 23075539/23023900 E-mail : pro@msrtc.gov.in Fax : 23086352


==========================================================

## PRESS NOTE

## MSRTC starts A/C Volvo service on Mumbai-Panjim route

**Mumbai,Wednesday, April 21, 2010**

Maharashtra State Road Transport Corporation (MSRTC) has started A/C Volvo service on Mumbai – Panjim route. Hon'ble Shri Gulabrao Deokar, Minister of State for Transport inaugurated this service today at 8.00 pm in the august presence of Shri Sudhakar Paricharak, Chairman, MSRTC & Shri Deepak Kapoor, Vice-Chairman & Managing Director of MSRTC. The bus leaves Mumbai Central at 20.00 hrs and cover the distance of 574 kms via Dadar- Kurla Nehru Nagar - Panvel- Mahad-Chiplun- Kankavli - Sawantwadi to reach Panjim next day at 6.30 hrs. The bus for its return journey, starts from Panjim at 20.00 hrs & reach Mumbai Central next day at 6.30 hrs via same route. The fare for adult will be Rs 862/-.

Reservation of this service is available on all the reservation centres and also ON LINE through MSRTC's website – www.msrtc.gov.in With this air-conditioned service, the growing demand of the tourists has been fulfilled. MSRTC Vice Chairman & Managing Director Mr Deepak Kapoor has urged the citizens of both cities & tourists to utilize & take benefit of this service.

**Asst Public Relations Officer**